अध्यापन/अध्ययन करीत असताना मोबाईल
(भ्रमण दूरध्वनी )बंद ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण.१००४/(१५४/०४)/माशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ८ सप्टेंबर २००४.

परिपत्रक :-

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात व संपर्क यंत्रणेत झालेली प्रगती लक्षात घेता सगळीकडे मोबाईलचा (भ्रमण दूरध्वनीचा )वापर करण्यात येत आहे.त्यामुळे शाळांतील बहुतांशी शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोबाईलचा वापर करीत आहेत.जगामध्ये संपर्क यंत्रणेत झालेली ही प्रगती अतिशय स्तुत्य असली तरी शाळेचा वर्ग सुरु असताना मोबाईल वाजला तर अध्ययन व अध्यापनामध्ये खंड पडून शिक्षक व विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होईल.हे लक्षात घेऊन शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करण्याबाबत आवश्यक त्या मर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. याव्दारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ सैनिकी व उच्च माध्यमिक शाळांतील /अध्यापन पदविका विद्यालयातील शिक्षक शाळेत अध्यापन करीत असताना व विद्यार्थी अध्ययन करीत असताना ; तसेच शाळेत राष्ट्रगीत व प्रार्थना सुरु असताना शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपआपले मोबाईल बंद ठेवावेत.

या निर्देशांचे पालन न केल्यास संबंधित शिक्षक व विद्यार्थी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक-
२००९०२१७१५३३१६००१

( सु. अ. साळवे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई.
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
निवड नस्ती (माशि २/५)